मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# चाळीस वर्षे



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Lyn Doerksen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



जेंव्हा परमेश्वराने इस्त्राएल लोकांना मिसर देशातून सोडवून बाहेर काढले, तेंव्हा देवाची भक्ति करण्यासाठी मोशेने इस्त्राएल लोकांचे नेतृत्व केले. त्याने एक स्तुति गित तयार केले. "मी परमेश्वराला गीत गाईन, कारण तो विजयी होऊन उन्नत झाला आहे."

परमेश्वराने इस्त्राएल लोकांसाठी ज्या महान गोष्टी केल्या आहेत त्या आठवून मोशेने गित गाईले.





तिस दिवसाच्या रानातील प्रवासानंतर तहानलेल्या लोकांना एक पाण्याचा झरा सापडला. परंतू ते कडू पाणी पिऊ शकत नव्हते. प्रार्थना करण्याऐवजी लोकांनी कुरकुर केली. परमेश्वर फार दयाळू आहे. त्याने ते पाणी पिण्याजोगे चांगले केले.



असे वाटते की, लोकांनी सर्व गोष्टींविषयी कुरकुर केली. "आम्ही मिसर देशात पुरेसे अन्न खात होतो, येथे तर आम्ही उपाशी मरत आहोत," याप्रकारे त्यांनी आक्रोश केला.



त्या संध्याकाळी परमेश्वराने लावा नावाचे पक्षी पाठवले. लोक त्यांना सहज पकडू शकत होते.



दुसऱ्या सकाळी देवाने मान्ना पाठविला. त्याची चव मध घालून केलेल्या पोळीसारखी होती. प्रत्येक दिवशी मान्ना जमिनीवर पडत असे, तो केवळ गोळा करण्याची गरज होती ऐवढेच. याप्रकारे देवाने रानात त्याच्या लोकांना अन्नाचा पुरवठा केला.

नविन अन्नासाठी प्रत्येक दिवशी त्यांना देवावर अवलंबून राहावे लागत असे. देवाने त्यांना सांगितले होते की जर तुम्ही जास्तीचा मान्ना गोळा कराल तर तो उद्या पर्यंत चांगला राहणार नाही तरी
काही लोकांनी
जास्तीचा
मान्ना गोळा
केला.



शब्बाथ दिवसाखेरिज इतर दिवशी गोळा केलेला जास्तीचा मान्ना दुसऱ्या दिवशी खात्रीपुर्वक किडे पडून सडून जात असे. त्या विशेष दिवशी; शब्बाथ दिवशी लोकांनी विश्रांती घेतली व काल गोळा केलेला मान्नाच खाल्ला.




देवाने
इस्त्राएल
लोकांची रानात
काळजी घेतली. त्याने
त्यांना अन्न व पाणी दिले ...
आणि त्यांना त्यांच्या
शत्रूंपासून सोडविले.

जेंव्हा
अमालेकींनी
त्यांच्यावर हल्ला
केला, तेंव्हा जोपर्यंत
मोशे देवाची काठी उचलून

धरित असे तोपर्यंत त्या
युध्दात इस्त्राएलांचा
विजयच होत असे.





देवाने इस्त्राएल
लोकांस सांगितले, "जर
तुम्ही माझी वाणी ऐकाल तर तुम्ही माझे खास
लोक व्हाल." लोक मोशेला म्हणाले, "परमेश्वराने जे
काही सांगितले आहे ते सर्व आम्ही करु." ते सिनाय
पर्वताच्या पायथ्याशी आले आणि मोशे देवाला
भेटायला गेला असता ते वाट पाहात होते.



मोशे पर्वतावर देवासंगती
चाळीस दिवस होता.
देवाने दगडाच्या
पाटीवर दहा
आज्ञा लिहिल्या.
त्याच्या लोकांनी
कसे जीवन
जगावे अशी
त्याची इच्छा आहे
हे त्याने मोशेला
सांगितले.

१. "माझ्या शिवाय तुला अन्य देव नसावेत."

२. "मुर्ति तयार करु नको किंवा तिच्या पाया पडू नको."

३. "परमेश्वराचे नाव व्यर्थ घेऊ नको."

४. "शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळ."


५. "आपल्या आई–
वडिलांचा
मान राख."
६. "खून करु नको."
७. "व्यभिचार करु
नको."
८. "चोरी करु नको."
९. "खोटे बोलू नको."
१०. "लोभ धरु नको."



मोशे पर्वतावर परमेश्वरा
संगती होता त्यावेळी इस्त्राएल
लोकांनी भितिदायक असे
काहीतरी केले. सोन्याचे
वासरु तयार करण्यास त्यांनी
अहरोनाला सांगितले... आणि
परमेश्वर देवाऐवजी त्यांनी त्या
वासराची भक्ति केली. यामुळे
देवाचा क्रोध भडकला. आणि
मोशेचा देखिल राग भडकला.



मोशेने जेंव्हा ते वासरु व नाचणारे लोक पाहिले तेंव्हा त्याने त्याच्या हातातील दगडाच्या पाट्या जमिनीवर आपटल्या. रागा–रागाने मोशेने त्या सोन्याच्या वासराचा नाश केला. ज्या दुष्ट लोकांनी त्याची पुजा केली होती त्यांना त्याने मारुन टाकले.

त्या पाट्यांच्या बदली देवाने
दोन दगडी पाट्या दिल्या.
त्याने मोशेला दर्शन मंडप उभा
करण्यास सांगितले. दर्शन मंडप
म्हणजे सभोवती कुंपण असलेला
मोठा तंबू ज्यांत परमेश्वर
त्याच्या लोकांसंगती
राहू शकत
होता.



ते ठिकाण देवाची भक्ति
करण्याचे होते. मेघस्तंभ व
अग्निस्तंभाने देवाची उपस्थिती
त्यांच्याबरोबर होती
हे दिसत होते.



ते कनान देशाच्या जवळ येऊन पोहोचले तेंव्हा जो देश देवाने त्याच्या लोकांना देण्याचे अभिवचन दिले आहे तो कसा आहे ते हेरण्यासाठी मोशेने बारा हेर पाठविले.



तो देश सुंदर आहे यावर सर्व हेर एकमत होते! परंतु केवळ दोनच हेर; यहोशवा व कालेब यांचा विश्वास होता की देवाच्या मदतीने तो देश आम्ही जिंकू शकू.



अन्य दहा हेर मजबूत शहरे आणि
तेथे राहणारे धिप्पाड लोक
यांना पाहून
घाबरुन
गेले होते.



"आम्ही तो देश
जिंकू शकत नाही"
अशा शब्दात त्यांनी
दुःख प्रदर्शीत केले.

मिसर देशातून बंधमुक्त करण्यासाठी परमेश्वराने जी अद्भुत कार्ये केली होती ती ते विसरले होते.



त्या लोकांनी दहा विश्वास न ठेवणाऱ्या हेरांचे अनुकरण केले. ते रडले व मिसर देशात परत जाण्याची त्यांनी तयारी केली. ऐवढेच नव्हे तर त्यांनी मोशेला जीवे मारण्याचा देखिल प्रयत्न केला.

देवाने मोशेच्या जीवाचे संरक्षण केले.



आणि मग परमेश्वराने लोकांना असे सांगितले, "तुम्ही या रानात चाळीस वर्षे भटकत राहाल. जो देश तुम्ही हेरुन आला आहात त्यात केवळ कालेब आणि यहोशवा, तसेच तुमची लेकरे जिवंत राहून त्यात प्रवेश करतील."



चाळीस वर्षे

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

निर्गम १५ ते गणना १४

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गोतल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे.  कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन.  तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर.  आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16